ललिता गंडभीर
215 Hartman Rd.
Newton, MA 02459

# फन्, फन्, फन्

आज माझ्या घरी आमच्या रस्त्यावरच्या माझ्या मैत्रिणींचा कॉफी ग्रुप लंचला जमणार होता. (नाव कॉफी ग्रुप असलं तरी लंच, डिनर काहीही चालत असे.) आमच्या ग्रुपच्या सगळ्याजणींची माझ्या घरी चमचमीत भारतीय खाद्यपदार्थ मिळावेत अशी अपेक्षा असे. पण त्यांच्या दुर्दैवाने (व माझ्या सुदैवाने) कालपासून आमचा इलेक्ट्रिक स्टोव्ह बिघडला होता. मी इलेक्ट्रिशियनला फोन केला होता. त्याने जमलं तर आज येतो नाही तर उद्या असं सांगून फोन ठेवला होता. थोडक्यात भारतीय स्वैपाक अशक्य होता. आणि कुणी तक्रार केलीच तर माझ्याकडे उत्तम सबब होती, "काय करू? स्टोव्ह बिघडला." मग "पुढच्या वेळी नक्की छान भारतीय स्वैपाक करीन" असं आश्वासन दिलं की माझ्या सख्यांची तोंडं बंद पडणार होती.(असा माझा भोळा विश्वास.)

फ्रिजमधे उकडलेली अंडी होतीच. त्यांची मी सँडविचेस केली. सॅलड केलं. सोबतीला शेव-चिवड्याचा नैवेद्य मांडला. गोड काहीतरी हवं तर आइस्क्रीम होतं.

दुपारी बाराच्या सुमाराला सगळ्या साळकाया माळकाया उगवल्या. नेहेमीप्रमाणे आल्या आल्याच जोनीने "लंचला काय?" हा प्रश्न विचारला व डायनिंग टेबलाकडे दृष्टीक्षेप करत ती म्हणाली, "मी तुझ्या घरी सँडविचेस खायला येत नाही." बाकीच्यांनीही तिचीच री ओढली. "सँडविचेस होती हे माहीत असतं तर मी अर्ध्या दिवसाची सुट्टी घेतली नसती." वैतागाने टिना म्हणाली.

"आम्ही सँडविचेसवाली टर्न फक्त अर्धी मानणार. आता परत अर्धी टर्न घेशील तेव्हा इंडियन फूडच हवं." ही कॅरल.

"स्टोव्ह चालत नव्हता" ही सबब मानायला कुणी तयार नव्हतं.

"मग माझ्या घरी येऊन स्वैपाक करायचा होतास!"

"मायक्रोवेव्ह नव्हता वाटतं?"

"आजचा बेत पुढे का नाही ढकललास?"

अशी मुक्ताफळं मला ऐकावी लागलीच.

"टोपाझ कुठे?" मी विषय बदलला.

कॅरलने सांगितलं, "तिच्या आईची प्रकृती बिघडली. ती आज येणार नाही." मग कॅरलने जोनीपुढे टाळीसाठी हात धरत म्हटलं, "म्हणून टोपाझबद्दल गॉसिपिंग करायला आपण मोकळे." जोनीने टाळी द्यायला वर केलेला हात टिनाने वरच्यावरच पकडला आणि रागाचा आव आणत ती म्हणाली, "नो गॉसिपिंग हा आपला नियम तू विसरलीस वाटतं?" मग तिचं कुतूहल जागृत झालं असावं. "टोपाझबद्दल तुला काही सांगायचंय का?" तिने हळूच विचारलं.

"टोपाझबद्दल नाही पण मार्थाबद्दल सांगायचंय" कॅरलने टिनाच्या कानात सांगण्याचा आविर्भाव केला. पण ती येवढ्या मोठ्याने बोलली की सगळ्यांना ऐकू गेलं. मग ती सर्वांना म्हणाली, "आपल्या ग्रुपमधल्या कुणाबद्दल गॉसिपिंग करायचं नाही असा नियम आहे. मार्था आपल्यात मिसळते का? शेवटचं वाक्य बोलताना तिने नाक वरती करून (मार्थासारखं) तोऱ्यात चालून दाखवलं. मग माझ्याकडे वळत ती म्हणाली, "हो की नाही बिना?"

माझ्या उत्तराची वाट न बघताच तिने आपली टकळी सुरू केली, "यू नो मार्था...."

तिचं वाक्य मधेच तोडत जोनी म्हणाली, "थांब थांब. मला फ्रिजमधून ड्रिंक घेऊ दे. मग काय ते सांग."

एव्हाना टिना व कॅरल स्वतःसाठी ड्रिंक बनवून डायनिंग टेबलाभोवती स्थानापन्न झाल्या होत्या.

"तुला काय हवंय बिना?" जोनीने मला विचारलं. "चांगली स्ट्राँग मार्टिनी?"

"नको. नको. मी वाइन घेईन" मी तिला सांगितलं.

जोनीने स्वतःचं ड्रिंक बनवलं. मी अजून किचनमधे खुडबुडत होते. मला खुर्चीत ढकलत ती म्हणाली, "सिट डाऊन!" मग माझ्यासमोर तिने वाइनचा ग्लास मांडला व स्वतः खुर्चीवर बसत ती कॅरलला म्हणाली, "आता सांग."

कॅरलने बोलायला तोंड उघडलं न उघडलं तोच दरवाजात किल्ली फिरल्याचा आवाज झाला आणि राहुल दरवाजात अवतरला.

मी म्हटलं, "राहुल, तू यावेळी इथे काय करतोयस?"

"हे घर माझंही आहे" राहुलने उत्तर दिलं. काही कारणाने त्याचं डोकं गरम झालेलं होतं हे मी ओळखलं.

टिना म्हणाली, "यू टू इंग्लिश प्लीज! सो वुई कॅन एन्‌जॉय युवर फाइट."

राहुल दिसताच जोनीने कॅरलला डोळा मारला आणि पूर्वी ठरल्याप्रमाणे त्या दोघी दरवाजाच्या दिशेने धावल्या. राहुल मला तिरसट उत्तर देऊन दरवाजा बंद करायला वळला होता तो आत येण्यासाठी परत फिरला तर ह्या दोघी त्याच्या दोन बाजूला उभ्या.

त्याच्या गळ्यात हात टाकत जोनी म्हणाली, "वेलकम डार्लिंग. कम इन. मेक युवरसेल्फ कंफर्टेबल."

कॅरलने जोनीला ढकललं आणि राहुलच्या गळ्यात हात घालत ती म्हणाली, "गेट अवे. ही इज माइन."

जोनी म्हणाली, "नो. ही इज युवरस् अँड माइन." असं म्हणत तिने राहुलचा एक दंड पकडला.

"ओके" म्हणत कॅरलने त्याचा दुसरा दंड पकडला. आणि त्या दोघी त्याला डायनिंग टेबलाकडे खेचू लागल्या.

बायकांच्या कंपूत पुरुष सापडला की त्याची परिस्थिती कशी होते ह्याचं उदाहरण मी एकदाच पाहिलं होतं. एकदा मी व राहुल रात्री पॅरिसमधे हरवलो व चुकून वेश्यांच्या वस्तीत पोचलो. तेव्हा दोन बायका राहुलचा दंड पकडून त्याला दोन दिशांना खेचू लागल्या. मला राहुल त्यांच्या तावडीत सापडला तर काय होईल यापेक्षा मी तिथे रात्री एकटीच अडकले तर माझं काय होईल याची जास्त काळजी होती. मी चक्क राहुलच्या कमरेला मिठी मारून त्याला तिसऱ्या दिशेला खेचू लागले.

त्यावेळचा राहुलच्या चेहेऱ्यावरचा गोंधळ मी कधीच विसरणार नाही. (आनंद + खुषी + वैताग + काळजी). ह्या क्षणीही त्याला तसंच काहीसं हसावं का रडावं हे समजत नव्हतं.

त्या दोघींनी त्याला ओढत डायनिंग टेबलापर्यंत आणला आणि खुर्चीवर ढकलून बसवला. अकस्मात राहुल जागा झाला.

"तुम्ही काय हशीश घेतलीय का क्रॅक क्रोकेन?"

"हशीश" जोनी डोळे मिचकावत म्हणाली.

"नो, क्रॅक कोकेन!" कॅरलने भुवया उडवल्या." आय ॲम हाय हाय हाय" असं म्हणत हात उडवले.

राहुल खुर्ची सरकवत उभा राहिला. "माझी एक महत्वाची फाइल घरी राहिलीय ती न्यायला आलो तर इथे हा तमाशा चाललाय." तो मला मराठीत म्हणाला.

"इंग्लिश, डार्लिंग, इंग्लिश" असं म्हणत जोनी व कॅरल त्याला त्याचे खांदे दाबून खुर्चीत बसवायचा प्रयत्न करू लागल्या. राहुल खुर्ची ढकलून स्टडीरूमकडे धावला. त्या दोघी त्याच्यामागे धावल्या पण त्याने चट्कन दरवाजा बंद करून आतून लॉक केला. त्या दोघी हसत सोफ्यावर कोसळल्या. कॅरल मधेच उठून स्टडीबाहेर उभी राहून ओरडली, "वेट टिल यू कम आउट"

तोच दरवाजाची बेल वाजली. कॅरल व जोनी लगेच दरवाजाकडे धावल्या. पण यावेळी मी पुढे सरसावले आणि त्यांना मागे सारत मी दरवाजा उघडला. तर दरवाजात तरणाबांड, रोमन पुतळ्यासारखा दिसणारा कुरळ्या, काळ्या झुलुपांचा व सरळ नाकाचा तगडा जवान उभा होता. त्याने युनिफॉर्म घातला होता. कमरेवर हात घेऊन माझ्या दोन बाजूंना ऋद्धी-सिद्धीसारख्या भरतनाट्यम्च्या कमनीय पोझमधे कॅरल व जोनी हसत उभ्या होत्या. त्यांच्याकडे तो काही क्षण आश्चर्याने बघत उभा राहिला. मग त्याची नजर जोनीवर स्थिरावली.

उंच, सडपातळ, रेखीव नाकाडोळ्यांची सोनेरी केसांची जोनी मोहक होती. अशी सुंदरी डोळ्यासमोर हसत उभी असली तर तरुण पुरुष तिच्याकडे बघणार नाही तर काय करणार?

"आर यू द इलेक्ट्रिशियन?" ह्या माझ्या प्रश्नाने तो शुद्धीवर आला.

"येस. मे आय कम इन?" असं म्हणत तो आत आला. स्टोव्हशी खुडबुडला. मग खाली वाकून मागच्या वायरस् तपासू लागला.

दोघी ऋद्धी-सिद्धी त्याच्यामागे होत्याच. त्याने अव्हनमधे डोकं घातलं तर या दोघीही बाजूने वाकून अव्हनमधे बघू लागल्या. मग तो फ्लॅशलाइट घेऊन बेसमेंटमधे गेला तेव्हा या दोघीही त्याच्यामागे गेल्या. त्याला एकूण हा प्रकार आवडलेला दिसला. तो त्यांना काहीबाही सांगू लागला. त्या दोघी हसू लागल्या. मी व टिना मागे उभं राहून मजा बघत होतो. शेवटी त्याने फ्यूज बॉक्स उघडलं. आणि "नथिंग रॉंग वुइथ युवर वायरिंग ऑर द स्टोव्ह. यू ब्लू अ फ्यूज" म्हणाला.

मी 'फ्यूजबॉक्स बघण्याचं कसं सुचलं नाही?' म्हणून लाजल्यासारखी झाले. मुकाट्याने वर जाऊन त्याने पुढे केलेल्या कागदावर सही केली. "दॅट वॉज अ फन कॉल" म्हणत त्याने कॅरलला व जोनीला डोळा मारला. मग वाकून आम्हाला मुजरावजा अभिवादन करत तो म्हणाला, "कॉल मी एनीटाईम, डे, नाइट, वीकएण्ड. आय ॲम ॲट युवर सर्व्हिस."

"ओ.के." कॅरल म्हणाली.

तो जाताच त्या दोघी परत हसू लागल्या. मी व टिना त्यांना सामील झालो.

सुरवातीला तो इलेक्ट्रिशियन थोडा बावचळलेला दिसला तरी मग त्याला मजा आली असावी असा मी अंदाज केला. तरी पण काही म्हणा, बायका चढाईखोरपणे वागू लागल्या तर पुरुष गोंधळतो हे मात्र खरं. कसं वागावं हे त्याला समजत नाही.

कॅरल व जोनीचं हसणं थांबत नव्हतं. त्यांच्या डोळ्यातून पाणी येत होतं. त्यांच्याकडे बघून म्हणजे त्यांचं हसणं बघून मी व टिना पण हसत होतो. असा थोडा वेळ गेला तर परत बेल वाजली.

मी दरवाजा उघडला तर बाहेर टिनाचा नवरा मार्क उभा होता. कॅरल व जोनी ताबडतोब उठून दरवाजाकडे धावल्या. टिनाने, "व्हॉट आर यू डुईंग हिअर?" असा प्रश्न विचारला आणि उत्तराची वाट न बघता ती हसू लागली.

कॅरल आणि जोनीने मार्कला उत्तर द्यायची संधीच दिली नाही. राहुलसारखंच त्याचं स्वागत झालं. त्याचा चेहेरा राहुलसारखाच झाला. नवऱ्याचं तोंड बघून टिना मोठ्यांदा खिदळू लागली.

मार्कला जोनी व कॅरलने खुर्चीत ढकलला. तो डोकं धरून खुर्चीत बसून राहिला. मग म्हणाला, "डोकं दुखतंय म्हणून घरी जात होतो. टिनाची कार या घरासमोर दिसली म्हणून थांबलो."

"आय विल फिक्स युवर हेड" असं म्हणत जोनी त्याचं डोकं दाबू लागली.

मी टायलेनॉल आणायला म्हणून उठले. तोच राहुल खोलीतून बाहेर पडून तीरासारखा दरवाजाकडे धावला व दरवाजा आपटून बंद करून निघून गेला.

"ओ! ही इज गॉन. बट वुई स्टिल हॅव यू" असं म्हणत लडिवाळपणे कॅरलने मार्कला "तुला प्यायला काय हवंय?" असा प्रश्न विचारला.

"व्हाय डिड ही रन् अवे?" मार्कने विचारलं. मग टिनासमोरचं ड्रिंक उचलून स्वतःच्या घशात ओतलं. मी त्याच्या समोर धरलेलं टायलेनॉल त्याने पाण्याबरोबर घेतलं. "हॅव अ सँडविच" म्हणत जोनीने त्याच्यासमोर धरलेलं सँडविच त्याने एका दमात संपवलं. मग तो जरा शुद्धीवर आला असावा. टिनाचं खी खी चालूच होतं. जोनी व कॅरल त्याच्या दोन बाजूला उभं राहून "डू यू वॉंट अ मसाज?" म्हणून विचारत होत्या.

मग त्याने "आर यू ऑल हाय ऑन सम ड्रगज्?" असा प्रश्न काळजीयुक्त स्वरात विचारला व तो खुर्चीतून उठू लागला. जोनी व कॅरलने त्याला परत खुर्चीत ढकलला.

"ड्रग कुठे ठेवलेत?" असं विचारत तो परत उभा राहिला. मग "ओ माय हेड" म्हणत डोकं दाबत खाली बसला. "नाऊ आय नो व्हाय राहुल टुक ऑफ. आय ॲम इन नो कंडिशन टू डील वुइथ यू नटस्" म्हणत चटकन उठून पळून जाऊ लागला. कॅरल व जोनीने त्याला पकडलाच पण त्याने स्वतःला त्यांच्या हातातून हिसकलं व तो दरवाजा उघडून नाहीसा झाला.

आता सगळ्यांच्या हसण्याला ऊत आला. "फन् फन् फन्" म्हणत डोळ्यात्लं पाणी पुसत जोनी हसू लागली. मधेच शेव खाण्याचा प्रयत्न करू लागली. त्याचा तिला ठसका लागला. अशीच दहा मिनिटे गेली आणि परत बेल वाजली.

जोनीनेच दार उघडलं तर समोर तिचाच नवरा माइक उभा होता. जोनीला ढकलतच तो आत आला. "व्हॉट आर यू डुईंग हिअर?" ह्या जोनीच्या प्रश्नाला उत्तर न देता तो म्हणाला, "मार्कचा मला फोन आला होता."

आता आम्ही चौघीही खिदळू लागलो.

"कम ऑन डार्लिंग" म्हणत जोनी त्याला खुर्चीकडे खेचू लागली. पण तिचा हात हिसडून तो किचन कॅबिनेटस्‌चे दरवाजे उघडून आत ड्रगज् शोधू लागला.

"ड्रगज् कुठे ठेवलीत?" त्याने जोनीला विचारलं.

"आय ॲम नॉट टेलिंग." ती मान वेळावत म्हणाली.

तोच परत बेल वाजली. जोनीने परत दरवाजा उघडला. कॅरलचा नवरा स्कॉट आत आला.

"डिड यू फाइंड एनिथिंग?" त्याने माइकला विचारलं.

"नॉट सो फार" माइक म्हणाला.

एव्हाना ही थट्टा छताबाहेर चाललीय असं मला वाटू लागलं. "आय गॅरंटी यू, नो ड्रगज् हिअर" मी माइक व स्कॉटला सांगितलं. स्कॉटने माझ्याकडे रोखून बघत खांदे उडवले.

स्कॉटला आपल्या बायकोचा- कॅरलचा थट्टेखोर स्वभाव माहीत होता. "माइक, दे आर जोकिंग" त्याने माइकला सांगितलं.

"दे शुअर फूलड् मार्क" माइक म्हणाला.

कॅरल म्हणाली, "मार्क इज राइट. वुई डिड टेक ड्रगज्. आय ॲम हाय हाय" तिने हात, डोळे व मान उडवली. पण तिच्याकडे माइक व स्कॉटने लक्ष दिलं नाही. त्यांचं लक्ष डायनिंग टेबलाकडे वळत होतं. टेबलाकडे बघत स्कॉट म्हणाला, "हे काय? इंडियन फूड नाही?"

"स्टोव्ह...फ्यूज बॉक्स...नेक्स्ट टाइम..." असं जोनी हसत म्हणाली.

"वुमेन लव्ह टू गॅंग अप ऑन मेन व्हेन दे गेट टुगेदर" स्कॉटने माइकला सांगितलं. मग "मला कामाला परत जायला हवं. मला या इनसेन असायलम्‌मधे आणखी थांबायचं नाही" असं म्हणत स्कॉट जायला निघाला.

कॅरल "वेट डार्लिंग. वुइ आर हॅविंग सो मच फन" म्हणत त्याच्या गळ्यात पडली, पण तिला ढकलून "आय विल टीच यू अ लेसन टुनाइट" असं पुटपुटत तो निघून गेला.

त्याच्या मागोमाग "आय अॅग्री. धिस इज अ मॅडहाउस" असं म्हणत माइक अक्षरशः निसटला.

"मी लंच विसरले" असं म्हणत कॅरल व जोनी डायनिंग टेबलावरचं सँडविच उचलून खाऊ लागल्या. तोच परत बेल वाजली. कोण ते बघताच सगळ्याजणी हसू लागल्या.

मी दरवाजा उघडला तर "आय वॉंट सम फूड" असं म्हणत टोपाझ आत आली.

"ओ इटस् ओनली यू?" असं म्हणत जोनी तिला सँडविच देऊ लागली. आमच्याकडे बघताच आम्ही खूप हसत होतो हे टोपाझच्या लक्षात आलं.

"काय झालं? तुम्हाला खूप मजा आलेली दिसते. पुढच्या वेळी अशीच मजा आपण करू!' ती म्हणाली.

मी म्हणाले, "अशी मजा ठरवून करता येत नाही. आज योगायोग जुळून आला तसा परत कधी येईल की नाही अशी मला शंका आहे."

टिना, जोनी व कॅरलने माझं म्हणणं बरोबर आहे ह्या अर्थाने माना डोलावल्या. तोच उघड्या दरवाजातून मुलं घरी आली.

"आय टोल्ड यू, दे आर अॅट अवर होम" मंदार जोनी व कॅरलच्या मुलांना म्हणाला.

पार्टी संपल्याची ती नांदी होती.

माझी बत्तिशी वठली. ह्या पार्टीला आलेली मजा परत कुठल्याच पार्टीला आली नाही.

नवऱ्यांना सतावण्याची मजा नाहीतरी आगळीच असते!